| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ३५६ /२०२५** **दिनांक :- १४/०१/२०२५**

**प्रसिद्धिपत्रक**

गणेशखिंड रोडवरील, पुणे विद्यापीठ चौक ते शिवाजीनगर कोर्ट दरम्यान टाटा मेट्रोचे काम सुरु आहे. पुणे विद्यापीठ चौक या ठिकाणी टाटा मेट्रोची खालील कामे करावयाची आहेत.

**१. पुणे विद्यापीठ चौकामध्ये दुमजली उड्डाण पुलाचे कामासाठी बाणेर रॅम्पचे बांधकाम करणे**

**२. PMR १९/०२ चे काम करणे.**

गणेशखिंड रोडवरील टाटा मेट्रोच्या दुमजली उड्डाण पुलाचे बाणेर रॅम्पचे बांधकामा तसेच PMR १९/०२ चे पिलर रस्त्याचे दोन्ही बाजुस येत असल्याने त्याचे कामासाठी वाहतूक सुरळीत व सुरक्षित सुरु राहण्याकरीता व वाहतूक कोंडी होवु नये म्हणुन वाहतूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, दिनांक १५/०१/२०२५ पासुन पुढील आदेशापर्यंत वाहतूकीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगीक तत्वावर खालीलप्रमाणे बदल करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.

**१) बाणेर कडुन शिवाजीनगर कडे जाणारी वाहतुक -**

- बाणेर कडुन येणारी वाहतुक औंध रोडवर वळवुन राजभवन समोरील पंक्चर मधुन यु टर्न घेवुन पुन्हा विद्यापीठ मार्गे शिवाजीनगर इच्छित स्थळी जाईल

**२) शिवाजीनगर कडुन औंध कडे जाणारी वाहतुक -**

- शिवाजीनगर कडुन औंध कडे जाणारी वाहतुक ही पुणे विद्यापीठ चौकातुन सरळ औंध रोड मार्गे इच्छित स्थळी जातील

**३) औंध कडुन शिवाजीनगर कडे जाणारी वाहतुक -**

- औंध कडुन शिवाजीनगर कडे जाणारी वाहतुक ही मिलेनियम गेट चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन चे गेट मधुन - पुणे विद्यापीठ परिसर - उजवीकडे वळुन - वाय जंक्शन- विदयापीठ मुख्य प्रवेशव्दारातुन बाहेर पडुन इच्छित स्थळी जातील.

(नागरीकांनी वरील मार्गाचा वापर करावा तसेच वाहतुक कर्मचारी / स्वयंसेवक यांना सहकार्य करावे. )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२) पोलीस आयुक्त सो,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी.

**५) प्रभारी अधिकारी चतुश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर**